# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.06.2026** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान आजपासून ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर
2. 12 वा आंतरराष्ट्रीय योग दिनासाठी विविध ठिकाणी योग कार्यक्रमांचं आयोजन
3. 10 हजार टन क्षमतेच्या अत्याधुनिक अल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेस प्रकल्पाची पायाभरणी आणि
4. भारत-अफगाणिस्तान दरम्यान आज तिसरा आणि अंतिम 50 षटकांचा क्रिकेट सामना

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती दौपदी मुर्मू आजपासून ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. ओडिशामध्ये, राष्ट्रपतींच्या 68 व्या वाढदिवसानिमित्त, मयूरभंज जिल्ह्यातील पहाडपूर गावात आयोजित कार्यक्रमात सहभागी होतील. 'संथाली जाहेरा' आणि 'हो जाहेरा' या उपवनांमध्ये आयोजित प्रार्थना कार्यक्रमांत सहभागी होतील तसंच 47 हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी त्यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान ओडिशातील झारसुगुडा जिल्ह्यातील लखनपूर इथं 25 हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या कोळशापासून वायुनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पाची पायाभरणी करतील. कोळसा मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकल्प देशातील व्यावसायिक स्तरावरील कोळशापासून अमोनियम नायट्रेट बनवणारा पहिलाच प्रकल्प आहे. स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून या प्रकल्पात दररोज दोन हजार टन अमोनियम नायट्रेटचे उत्पादन केलं जाणार आहे. पश्चिम बंगालच्या दोन दिवसांच्या दौऱ्यादरम्यान, पंतप्रधान आज हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर इथं होणाऱ्या 'पश्चिम बंगाल दिवस' सोहळ्यात सहभागी होतील.

**पंतप्रधान**

जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी शिक्षण, कौशल्य, सेवा, उत्पादन अशा सर्वच पातळ्यांवर गुणवत्ता हेच यशाचं मुख्य सूत्र आहे; उत्कृष्टता हीच भारताची ओळख बनली पाहिजे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत, 2 हजार 400 कोटी रुपयांच्या प्रोत्साहनपर निधीचं वितरण काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत झालं. त्यावेळी ते बोलत होते. विकसित भारताचा मार्ग केवळ गुंतवणुकीवर नाही, तर कौशल्य, प्रतिभा आणि नवोन्मेषाच्या शक्तीवर आधारित असेल, असं ते म्हणाले. देशातल्या 200 ठिकाणी या रोजगार कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यात, पुण्यातल्या चार ठिकाणांचा समावेश होता. प्रोत्साहनपर निधी वितरित करण्यापूर्वी, पंतप्रधानांनी विज्ञान भवन इथं काही तरुणांशी प्रत्यक्ष संवाद साधला. या कार्यक्रमाला केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविय उपस्थित होते.

**राजनाथसिंह-नागपूर**

केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते काल, यंत्र इंडिया लिमिटेडच्या, नागपूर मधील, अंबाझरी इथल्या, आयुध निर्माणीतील 10 हजार टन क्षमतेच्या अत्याधुनिक अल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेस प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. हा प्रकल्प म्हणजे देशांतर्गत उत्पादनक्षमतेला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा आहे, असं राजनाथ सिंह याप्रसंगी बोलताना म्हणाले. ही यंत्रणा आधुनिक लढाऊ विमानं, क्षेपणास्त्र आणि प्रगत अंतराळ संशोधन उपक्रमांसाठी वजनाला

हलक्या आणि मजबूत धातूची निर्मिती करेल, असं सिंह म्हणाले. यावेळी त्यांनी संरक्षण उत्पादन क्षेत्रातील देशाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

**नौदल-पुणे**

भारतीय नौदलासाठी 1 पुर्णांक 25 मेगावॅट क्षमतेचे 'मरीन गॅस टर्बाइन जनरेटर'चे 12 संच खरेदी करण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने पुण्यातील 'भारत फोर्ज लिमिटेड' या कंपनीसोबत 425 कोटी रुपयांचा करार केला आहे. नवी दिल्ली इथं काल संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या उपस्थितीत 'बाय इंडियन' या श्रेणीअंतर्गत हा करार करण्यात आल्याची माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली.

**अमितशहा-कोल्हापूर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज महाराष्ट्रातील कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. पश्चिम महाराष्ट्र विकास आराखड्याअंतर्गत श्री महालक्ष्मी मंदिर परिसरातील नूतन प्रदक्षिणा मार्ग आणि परिवार देवता मंदिर संवर्धन कामकाजाचा प्रारंभ त्यांच्या हस्ते होणार आहे. श्री अंबाबाई मंदिर तीर्थक्षेत्र विकासासाठी राज्य सरकारने 1 हजार 445 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यावेळी कोल्हापुरातील पोलीस परेड मैदानावर शहा यांची जाहीर सभा होणार आहे. त्यानंतर, इचलकरंजीत जवाहर साखर कारखान्याचा नामांतर सोहळ्याच्या कार्यक्रमालाही ते उपस्थित राहतील.

**योगदिन-बातमीपत्र वेळबदल**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम उद्या कोलकाता इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण सकाळी साडे सहा वाजल्यापासून आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून केलं जाणार आहे. त्यामुळे पुणे केंद्रावरून प्रसारित होणारे 'प्रादेशिक बातमीपत्र' या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणानंतर प्रसारित करण्यात येईल. 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' अशी 12 वा आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना आहे; सांस्कृतिक मंत्रालय देशभरातील शंभर ठिकाणी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करणार आहे, 'इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स' आणि परदेशातील भारतीय दूतावास यांच्या समन्वयाने यावर्षी जगभरातील एकंदर अडीच हजार ठिकाणी योग दिनाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. यामध्ये 210 हून अधिक भारतीय दूतावास सहभागी होत आहेत. अशी माहिती आयुष मंत्रालयाने दिली.

**अग्रवाल**

भारताचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी विवेक अग्रवाल यांची 2026-27 या कालावधीसाठी आर्थिक विषयातील कृती दल अर्थात FATF चे पुढील उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. ते युनायटेड किंगडमच्या गाइल्स थॉमसन यांची जागा घेतील. सध्या सांस्कृतिक मंत्रालयात सचिव म्हणून कार्यरत असलेले अग्रवाल यांनी यापूर्वी FATF मधील भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले आहे; तसेच, पैशांचा गैरव्यवहार आणि दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा रोखणाऱ्या या जागतिक संस्थेसोबत भारताच्या सहभागात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. 17 ते 19 जून दरम्यान झालेल्या FATF च्या पूर्ण अधिवेशनात हा निर्णय घेण्यात आला. परराष्ट्र मंत्रालयाने अग्रवाल यांची ही निवड भारतासाठी एक मोठे यश असल्याचं समाज माध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे.

**भारत-पाकिस्तान**

भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये पाकिस्तानवर कडक टीका केली असून, संयुक्त राष्ट्रांच्या उच्च आयुक्तांच्या वार्षिक अहवालावरील चर्चेदरम्यान पाकिस्तान आणि इस्लामिक सहकार्य संघटन यांनी जम्मू-काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर, संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या स्थायी मिशनच्या प्रथम सचिव अनुपमा सिंग यांनी ही प्रत्युत्तर दिलं.

**अमेरिका-इराण**

राजनैतिक चर्चा पुन्हा सुरू होण्यापूर्वी लेबनॉनमधील संघर्ष थांबला पाहिजे, असा आग्रह इराणनं धरल्यानं अमेरिकेचे उपाध्यक्ष जे.डी. व्हान्स आणि इराणचे वरिष्ठ वार्ताकार यांच्यात स्वित्झर्लंडमध्ये नियोजित असलेली चर्चा पुढे ढकलावी लागली आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिका, कतार आणि इराण यांच्यादरम्यान काल संध्याकाळी झालेल्या राजनैतिक प्रयत्नांनंतर इस्रायल आणि हिजबुल्ला यांच्यात काही प्रमाणात युद्धविराम लागू झाला आहे.

**सर्वोच्च-न्यायालय**

बँका, मालमत्ता पुनर्रचना कंपन्या आणि कर्जदार यांच्यातील संगनमताबाबत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त केली असून, मोठ्या प्रमाणावरील कर्ज थकबाकीची प्रकरणे ज्या पद्धतीने निकाली काढली जात आहेत, त्या पध्दतीं बाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची एकंदर दिड हजार कोटी रुपयांची कर्जे दोन 'ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपन्यां'मार्फत केवळ 73 कोटी 50 लाख रुपयांत निकाली काढण्यात आल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, रिझर्व्ह बँक आणि इतर संबंधित पक्षांना नोटिस बजावल्या आहेत.

**सर्वोच्च-न्यायालय**

चिन्हांकित पदपथावरून चालण्याचा अधिकार हा एक मूलभूत अधिकार आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने काल दिला. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती ए. एस. चंदुरकर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, चालण्याचा अधिकार हा प्राथमिक स्वरूपाचा असून, मोटार वाहनांच्या वाहतुकीपेक्षा त्याला प्राधान्य दिलं जावं. शाळेत जाताना पाच वर्षाचा मुलाचा मृत्यू झाला होता. या वाहन अपघातातील नुकसानभरपाईच्या खटल्याच्या संदर्भातील प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयानं काल हे स्पष्ट केलं.

**नीट**

राष्ट्रीय परिक्षा परिषदेच्यावतीने उद्या होणारी पदवीपुर्व NEET UG पुनर्परीक्षा सुरळीत, निष्पक्ष आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी यंत्रणा पूर्णपणे सज्ज असल्याचं एनटीएनं सांगितलं. ही परीक्षा भारतातील 551 आणि परदेशातील 14 शहरांमध्ये 22 लाखांहून अधिक उमेदवारांसाठी घेतली जाईल.

**क्रिकेट**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तिसरा आणि अंतिम 50 षटकांचा क्रिकेट सामना आज चेन्नईतील एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. यजमान संघाने 2-0 अशी आघाडी घेत मालिका आधीच खिशात घातली असून, आता या तीन सामन्यांच्या मालिकेत संपूर्ण यश मिळविण्याचं उद्दिष्ट असेल.

**पाऊस**

पश्चिम बंगालमध्ये मान्सून सक्रिय होत आहे. या भागात हवेचा कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून बंगालच्या उपसागरातून येणाऱ्या आर्द्रतेमुळे, आजपासून काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, आंध्र प्रदेश, तेलंगण आणि उत्तर-कर्नाटक या भागांत सोसाट्याच्या वाऱ्यासह वादळ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पूर्व उत्तर प्रदेश, बिहार, मध्य महाराष्ट्र आणि कोकण-गोव्यामध्ये आज उष्णतेच्या लाटेची स्थिती निर्माण होऊ शकते. असा अंदाजही हवामान विभागानं वर्तवला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.